| MHNS210011612020 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक : | २९/१२/२०२० |
| | नोंदणी दिनांक : | २९/१२/२०२० |
| | निकाल दिनांक : | १०/०३/२०२६ |
| | कालावधी : | वर्ष ०५ महिने ०२ दिवस १२ |

## [ Chapter VI of Criminal Manual of Para 44(i) ]

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मनमाड शहर यांचे न्यायालयात.**
**ठिकाण — मनमाड, जि. नाशिक.**
**(पिठासीन अधिकारी के.आर.मोरे)**
दि. १० मार्च २०२६

**नियमित फौजदारी खटला क्र.९८/२०२०. निशाणी क्रमांक ३६**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकार तर्फे पोलीस निरीक्षक,<br>मनमाड शहर पोलीस ठाणे, मनमाड. |
| **फिर्यादीतर्फे** | सरकारी अभियोक्ता श्री.ए.एस.पाटील |
| **आरोपी** | **१.निलेश बाळू आहिरे,** वय :२८ वर्षे,<br>रा.महानंद नगर, मनमाड, जि.नाशिक<br>**२.उदय चंद्रकांत साळुंके,** वय :३० वर्षे,<br>रा.रमाबाई नगर, ता. नांदगाव जि.नाशिक<br>**३.प्रविण बाळू आहिरे,** वय :३० वर्षे,<br>रा.अयोध्यानगर, मनमाड ता. नांदगाव जि.नाशिक |
| **आरोपीतर्फे** | विधिज्ञ श्री.एन.बी.केदारे |

## [Chapter VI of Criminal Manual of Para 44(ii)]

| | |
|---|---|
| **अपराध घडल्याची तारीख** | ०४.११.२०२० |
| **प्रथम खबर अहवाल नोंद दिनांक** | ०४.११.२०२० |
| **दोषारोप पत्र दाखल दिनांक** | ०६.१२.२०२० |
| **दोषारोप नोंदविल्याचा दिनांक** | ०६.०७.२०२३ |
| **साक्षीस आरंभ केल्याचा दिनांक** | २७.०६.२०२४ |
| **न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक** | ——— |

| | |
|---|---|
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १०.०३.२०२६ |
| **जर असेल तर शिक्षेच्या आदेशाची तारीख** | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामिनावर मुक्त केल्याचा दिनांक | गुन्हा आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | निलेश बाळू आहिरे<br>उदय चंद्रकांत साळुंके<br>प्रविण बाळू आहिरे | ०४.११.२०२० | ०६.११.२०२३ | भा.दं.वि. कलम ३८० सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

## [Chapter VI of Criminal Manual of Para 44(iii)]
## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार:

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **सा.क्र.१** | किरण शिवाजी देवरे/नि.क्र.२९ | प्रथम खबर देणार |
| **सा.क्र.२** | अनिल रमेश गरूड/नि.क्र.३१ | पंच |
| **सा.क्र.३** | विक्रम दामू भडांगे/नि.क्र.३३ | पंच |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार :

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **निरंक** | | |

**क. न्यायालयाचे साक्षीदार :**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | | **निरंक** |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाने दिलेल्या निशाण्यांची यादी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | सा.क्र.१/निशाणी क्र.३० | प्रथम खबर अहवाल |
| २. | सा.क्र.२/निशाणी क्र.३२ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **निरंक** | | |

**क. न्यायालयातर्फे :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १९ | दोषारोप |
| १. | २० ते २२ | आरोपींचे गुन्हा नाकबुलीचे निवेदन |

**ड. भौतिक वस्तू**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **निरंक** | | |

**:: न्यायनिर्णय ::**

(दिनांक — १०/०३/२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ३८० सह ३४ अन्वये दंडनीय अपराध केल्याच्या आरोपावरून दोषारोप ठेवण्यात आले व संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

**२. अभियोगपक्षातर्फे घटनेसंदर्भात हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :—**

दि.०४.११.२०२० रोजी रात्री ०१.०० वाजेच्या सुमारास पी.एन.टी. कॉलनीच्या पाठीमागे १४ नंबर मराठी शाळेजवळ पोलीस उपनिरिक्षक श्री जी.एच. जांभळे व इतर स्टाफ असे गस्त करत असतांना आरोपी संगनमत करून निळया रंगाच्या ओमनी मारूती व्हॅन क्र.एमएच१५बीएन७१९० मध्ये बीएसएनएल कंपनीचा मुद्देमाल रक्कम रूपये २०,०००/— चे पितळचे स्क्रॅपींगचे मटेरियल, टेलिफोन वायर, कनेक्टर, विंडो एस.पी.पार्ट, ॲल्युमिनियमचे हिंज इ. वस्तूंचा सरकारी मुद्देमाल चोरून घेउन जातांना मिळून आले. म्हणून प्रथम खबर देणारने दि.०४.११.२०२० रोजी आरोपींविरुध्द शहर पोलीस ठाणे, मनमाड यांच्याकडे प्रथम खबर अहवाल नोंदविला. त्यावरुन प्रथम खबर अहवाल गु.र.क्रमांक १०४८/२०२० अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.निरी श्री. जी.एच.जांभळे यांनी केला व तपासाअंती आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**३.** प्रस्तुत प्रकरणात माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र व दस्तऐवजांचे अवलोकन करून भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ३८० सह कलम ३४ नुसार **निशाणी क्र.१९** अन्वये दोषारोप नोंदविला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली. सदर प्रकरणामध्ये आरोपींनी बचावाचे साक्षीदार तपासले नाही.

**४.** अभियोगपक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ किरण शिवाजी देवरे, सा.क्र.२ अनिल गरूड व सा.क्र.३ विक्रम भडांगे यांना अनुक्रमे **निशाणी क्र.२९, ३१ व ३३** वर तपासले आहे. आरोपींविरूध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून न आल्याने **निशाणी क्र.१** अन्वये आदेश पारीत करून त्यांचे फौ.प्र.सं.चे कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यास सुट देण्यात येते.

**५.** अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. अभियोगपक्षतर्फे **सहा.सरकारी अभियोक्ता श्री ए.एस.पाटील** व **आरोपीतर्फे विधीज्ञ श्री एन.बी.केदारे** यांचा युक्तीवाद ऐकला.

६. दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेता खालील मुद्दे सदरचे प्रकरण निकाली काढणेकरिता तयार केले. त्यावर मी दिलेले निष्कर्ष सकारण खालीलप्रमाणे—

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपींनी संगनमताने बीएसएनएल कंपनीमधील सरकारी मुद्देमाल त्याचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने त्याचे कायदेशीर कब्जातुन काढून चोरी केली ? | **नाही.** |
| २. | अंतिम आदेश? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

**<u>मुददा क्र.१ करीता :</u>**

७. आरोपींविरूद्ध दाखल असलेल्या दोषारोपाप्रमाणे आरोपींनी बीएसएनएल कंपनीचे तांब्या पितळेचे स्क्रॅपींग मटेरियल त्यात टेलिफोन वायरचे कनेक्टर—१८, रिले टाईप कनेक्टर—१२ व विंडो अे.सी.पार्ट—३, अॅल्युमिनियमचे हिंज इ. मुद्देमालाची त्यांच्या ताब्यातील ओमनी व्हॅन क्र.एमएच१५ बीएन७१९० मधून संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने कायदेशीर कब्जातुन चोरी केली हे संशयापलिकडे सिदध्‌ करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकामी सा.क्र.१ किरण शिवाजी देवरे यांना **निशाणी क्रमांक २९** वर तपासले असून त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, घटनेच्या दिवशी ते बीएसनएल ऑफीसला इनचार्ज म्हणून कार्यरत होते. त्यावेळी त्यांना पोलिसांनी फोन वरून बीएसएनएल आवारात चोरी झाल्याचे सांगितले व मुद्देमाल जप्त केला असून पोलिस ठाण्यात बोलवले. त्यांना आरोपींचे नेमके चेहरे आठवत नसून आरोपी न्यायालयात हजर असल्याबाबत देखील त्यांनी साशंकता निर्माण केली. निशाणी क्र.३० वरील प्रथम खबर अहवाल त्यांनी मान्य केला असून आरोपींना ओळखण्यास ते अपयशी ठरले आहे. त्यांच्या उलटतपासात असे आले

आहे की आरोपींची नावे त्यांना पोलिसांनी सांगितली होती. तसेच घटना चार वर्षापूर्वीची असल्याकारणाने त्यांना आठवत नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

८. साक्षीदार क्र.२ अनिल रमेश गरूड व सा.क्र.३ विक्रम भडांगे हे पंच साक्षीदार असून त्यांच्या साक्षीत असे आले आहे की घटनेच्या दिवशी कोणताही जप्ती अथवा घटनास्थळ पंचनामा त्यांनी केलेला नाही. त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की ते आरोपींना ओळखत नसून घटनेच्या दिवशी ते घटनास्थळी उपस्थित नव्हते. ते आरोपींना ओळखत नसून निशाणी क्र.३२ वरील पंचनाम्यातील मजकूर त्यांनी नाकारला आहे. साक्षीदारांनी कोणत्याही प्रकारे अभियोगपक्षास सहाय्य केले नाही म्हणून भारतीय पुरावा कायदा १८७२ चे कलम १५४ नुसार त्यांना सुचक प्रश्न विचारण्याची अनुमती देवून देखील आरोपींविरूध्द ठेवलेले दोषारोप सिध्द होईल असे कोणतेही तथ्य अभिलेखावर आलेले नाही. सबब साक्षीदारांच्या साक्षीमधून अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाप्रमाणे दुजोरा देणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आणला नाही. प्रथम खबर देणा—याचे साक्षीचे अवलोकन केले असता तो घटना ऐकीव माहितीवर सांगत असल्याचे आढळून येते. करिता त्याची साक्ष आरोपींना दोषी घोषीत करण्याइतपत ग्राहय धरता येणार नाही.

९. नमूद कलमांन्वये आरोपींनी बीएसएनएल कंपनीमधून सरकारी मुद्‌देमालाची चोरी केली हे पुराव्यानिशी सिद्‌ध झाले नाही. अभियोगपक्षास प्रथम खबर अहवाल हाच सिध्द न करता आल्यामुळे अभियोगपक्षाच्या हकीकतीप्रमाणे प्रथम खबर देणारच्या जबाबामध्ये ज्या घटनांचा उल्लेख केलेला आहे त्या घटना नमुद दिवशी घडल्या किंवा नाही याबददल संशय निर्माण होतो सा.क्र.१ प्रथम खबर देणार किरण यांचा तोंडी पुरावा हा अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहाय्य करणारा नसल्यामुळे आरोपींना उपरोक्त गुन्हयामध्ये दोषी धरणेकरिता कोणताही पुरावा नाही असा निष्कर्ष क्रमप्राप्त आहे. त्या अनुषंगाने मुददा क्र १ चा निष्कर्ष नकारार्थी दिला आहे.

<u>**मुददा क्र.२ करीता :**</u>

**१०.** प्रथम खबर देणा—याने त्याच्या साक्षीमध्ये सांगितल्याप्रमाणे तो आरोपींना ओळखत नसून पोलिसांनी सांगितल्यामुळे त्याला आरोपींची नावे माहिती झाली. तसेच साक्षीदार आरोपींचे चेहरे ओळखत नसून घटना चार वर्ष जूनी असल्याने त्यांना आरोपीला ओळखता आले नाही. अशा परिस्थितीत आरोपी हे घटनास्थळी असून त्यांनी सरकारी मुद्देमालाची चोरी केली किंवा कसे यावर संशय निर्माण होतो. प्रथम खबर देणारा सा.क्र.१ किरण हा प्रत्यक्ष साक्षीदार नसून घटनेच्या वेळी तो घरी असल्याचे त्याने सांगितले आहे. त्याने असे देखील सांगितले आहे की आरोपींना त्याने पाहिलेले नाही. अशापिरस्थितीत अभियोगपक्षाच्या कथनामध्ये संशय निर्माण होतो त्याचा फायदा आरोपीपक्षाला देणे न्यायोचित ठरते. अभियोगपक्ष आरोपींविरूध्द सबळ पुरावा न्यायालयात दाखल न करू शकल्यामुळे आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मुददा क्र. २ करिता खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी क्र.१ **निलेश बाळू आहिरे, २.उदय चंद्रकांत साळुंके, क्र.३ प्रविण बाळू आहीरे** यांची भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ३८० सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **२.** | आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन पत्र रदद करण्यात येते. |
| **३.** | आरोपीं यांस निर्देषित करण्यात येते की, त्यांनी कलम ४३७ अ(१) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार त्याचे रक्कम रू १५०००/— चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र दयावेत. |

KRANTI RAMESH MORE

Digitally signed by KRANTI RAMESH MORE
Date: 2026.03.16 15:09:51 +0530

**दिनांक : १०/०३/२०२६.**
**ठिकाण :मनमाड**

**(के.आर.मोरे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**शहर न्यायालय, मनमाड**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहेत.

लघुलेखकाचे नांव — श्रीमती व्हि.जे.मोरे
न्यायालयाचे नाव — न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग—१, मनमाड शहर

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | : १०/०३/२०२६. |
| पिठासीन अधिका—यानी स्वाक्षरी केलेली तारीख | : १०/०३/२०२६. |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | : १३/०३/२०२६. |